जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
11 MAR 2020
Times of India

# Avoid large gatherings on campus, says UGC

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The University Grants Commission (UGC), in the wake of ongoing corona virus (Covid-19) scare, has asked varsities and colleges to avoid large gatherings on campus and ensure frequent cleaning of doorknobs, switches, and hand railings.

UGC secretary Rajnish Jain, in a recent circular, has laid emphasis on hand and respiratory hygiene.

"In reference to the communications received from secretary, Department of Health and Family Welfare and joint secretary, Ministry of Human Resource Department regarding taking preventive measures to combat the threat of the novel corona virus, a coordinated and collective effort in a mission mode is needed. Therefore, all universities and their affiliated colleges are requested to take necessary precautions and follow the advisory," Jain said.

"Everyone should cover their mouth with a tissue/ handkerchief (or their sleeve if there are no tissues available) when they cough or sneeze and wash their hands afterward," he added.

Meanwhile, D T Shirke, pro-VC of Shivaji University Kolhapur (SUK), told **TOI**, "We have initiated action on the said guidelines. Few extracurricular activities that were planned this month have been postponed and workshop related to corona virus in presence of medical officer was conducted. There is ample water availability across restrooms and we are on alert."

**वीरेंद्र चित्राव : ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज स्पर्धेत शिवाजी विद्यापीठ, शहाजी कॉलेज, सायबरला बक्षीस**

# पर्यावरण रक्षणासाठी कृतिशीलतेची जोड गरजेची

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** आतापर्यंत अनेक ठिकाणी विविध माध्यमांद्वारे पर्यावरण रक्षणासाठी जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. मात्र, याला सातत्यपूर्णपूरक कृतिशील उपक्रमांची गरज असल्याचे प्रतिपादन किर्लोस्कर वसुंधरा क्लबचे संचालक वीरेंद्र चित्राव यांनी केले.

किर्लोस्कर वसुंधरा इको रेंजर्स उपक्रमांतर्गत झालेल्या ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज (जीसीसीसी) स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले, वर्तमानकाळात पर्यायाने भविष्यकाळात पर्यावरण व असंतुलनामुळे मोठा धोका उद्‌भवू शकतो. विद्यार्थ्यांनी आपापले पारंपरिक शिक्षण घेत पर्यावरण चळवळीचा एक हिस्सा बनण्याचे आवाहन त्यांनी केले.



ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज स्पर्धेतर्गत प्रथम क्रमांक विजेत्या शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी विभागास डॉ. एस. व्ही. शिरोळ यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. यावेळी शरद आजगेकर, सुवर्णा भांबुरकर, वीरेंद्र चित्राव, प्रा. मधुरा माने आणि डॉ. दीपक भोसले उपस्थित होते.

डॉ. दीपक भोसले यांनी स्वागत केले. प्रास्ताविक भाषणात किर्लोस्कर समूहाचे सामाजिक बांधीलकी अधिकारी शरद आजगेकर यांनी किर्लोस्कर समूहातर्फे ही स्पर्धा आयोजित करण्यामागचा उद्देश स्पष्ट केला. या स्पर्धा म्हणजे विद्यार्थ्यांसाठी व्यक्त होण्याचे व्यासपीठ असून, येणाऱ्या काळात अधिकाधिक महाविद्यालयांनी यात सहभागी होण्याचे आवाहनही त्यांनी केले.

या स्पर्धेसाठी पर्यावरण तज्ज्ञ प्रा. मधुकर बाचुळकर, डॉ. सुवर्णा भांबुरकर, डॉ. टी. व्ही. शर्मा यांनी प्रशिक्षक म्हणून काम पाहिले. डॉ. बाचुळकर यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पर्यावरणीय लघुपटाचे कौतुक करुन अशा उपक्रमात विद्यार्थ्यांनी अखंडितपणे काम करण्याचे आवाहन केले. समाजकार्य विभागाचे डॉ. एस. व्ही. शिरोळ, प्रा. मधुरा माने यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. किर्लोस्कर समूहाचे राकेश सराटे यांनी आभार मानले.


## डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी प्रथम

ग्रीन कॉलेज, क्लीन कॉलेज (जीसीसीसी) स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी या विभागाने प्रथम क्रमांक मिळविला. शहाजी महाविद्यालयाच्या संघास द्वितीय, तर सायबर महाविद्यालयाच्या समाजकार्य विभागास तृतीय क्रमांकाने गौरविण्यात आले. सायबरच्या पर्यावरण शास्त्र विभाग आणि शिवाजी विद्यापीठाच्या समाज कार्य विभागास सहभागाबद्दल मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

# पाठांतरापेक्षा आकलनावर भर द्यावा

## डॉ. शिवराम भोजे; यादव महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण

सकाळ वृत्तसेवा



डॉ. भोजे

पेठवडगाव, ता. १० : परस्परांना सहकार्य करण्याची वृत्ती, सामाजिक उपक्रमातील सहभाग घेण्याचा संस्कार, शिक्षणातून झालेले संस्कार व्यवहारात आणता आले पाहिजेत. त्यासाठी पाठांतरापेक्षा आकलन करून घेण्यावर भर दिला पाहिजे. शिक्षणातून एक सुशिक्षित, सुसंस्कारित नागरिक घडला पाहिजे, असे मत पद्मश्री डॉ. शिवराम भोजे यांनी व्यक्त केले. ते येथे श्री विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालय आणि सावित्रीबाई फुले महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. या वेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर प्रमुख उपस्थित होते. माजी पोलिस आयुक्त गुलाबराव पोळ अध्यक्षस्थानी होते.

डॉ.भोजे म्हणाले,'शिक्षण हे मातृभाषेतूनच झाले पाहिजे. पण त्याचवेळी इंग्रजी व संगणकाचे ज्ञानही प्राप्त केले पाहिजे. मोबाईल, दूरदर्शन याचा वापर चांगल्या गोष्टी, संस्कार यासाठी झाला पाहिजे. पण दुर्देवाने तो होत नसल्याचा दिसते.' यावेळी कला व विज्ञान शिक्षणशास्त्र विभागातून पदवी प्रदान विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पदवी प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. प्रमुख अतिथी व मान्यवरांचे मिरवणूकीने समारंभस्थळी आगमन झाले.

प्राचार्य डॉ. विजया चव्हाण यांनी प्रास्ताविक केले. परीक्षा विभागप्रमुख डॉ. रमेश कारंडे यांनी प्रमुख अतिथींची ओळख करून दिली. डॉ. वर्षा सहदेव व डॉ. राजन अतिग्रे यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य दयावती चव्हाण यांनी आभार मानले.

या वेळी संस्था संचालक जयकुमार गणपते, नगरसेविका संगिता मिरजकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य पी. बी. पाटील, उपप्राचार्य किरण कोळी, मुख्याध्यापिका आनंदी माने, गिरीजा देवस्थळी आदी उपस्थित होते.

" आपण प्रयत्नवादी असले पाहिजे. प्रयत्नात सातत्य असायला हवे. अपयश आले तर ते का आले, हे पाहून चुका सुधारता आल्या पाहिजेत. यश नक्की मिळते. कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी पदवीनंतर येणाऱ्या विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतील. यासाठी ज्या क्षेत्रात आपण जाल, तेथे आपले ज्ञानानुभव व कर्तृत्वाचा ठसा उमटवा.

-डॉ. विलास नांदिवडेकर, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ

व्याख्यान : सकाळी ९ वा. शिवाजी विद्यापीठ, संत तुकाराम अध्यासनाच्या वतीने संत तुकाराम बीज व्याख्यानमाला. वक्ते : प्रा. राजा माळगी. विषय : संत तुकाराम यांचा भक्तियोग. वक्ते : दिनकर चौगले. विषय : संत तुकाराम गाथेतील नीतितत्त्वे. स्थळ : विठ्ठल मंदिर, राशिवडे बुद्रुक.

• व्याख्यान : दुपारी १२ वाजता. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातर्फे कुसुमाग्रज स्मृतिदिन व्याख्यानमालेअंतर्गत व्याख्यान. विषय : कुसुमाग्रजांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्व. वक्ते : ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे. स्थळ : भौतिकशास्त्र अधिविभाग सभागृह, शिवाजी विद्यापीठ.

# शिवाजी विद्यापीठात आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागातर्फे 'कवी कुसुमाग्रज स्मृतिदिन व्याख्यानमाले' अंतर्गत बुधवारी (ता.११) दुपारी १२ वाजता 'कुसुमाग्रजांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व' या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. ज्येष्ठ समीक्षक प्रा. अविनाश सप्रे विवेचन करणार आहेत. कार्यक्रम भौतिकशास्त्र अधिविभाग सभागृहात होईल. व्याख्यानास उपस्थित राहावे, असे आवाहन मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.